**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे श्री.आर.व्ही.कुळकर्णी वकील यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**५.** (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १९/1 कडील कागद दाखविला) आता मला दाखविलेला कागद हा आरोपीने मला दिलेला धनादेश आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. (सदर धनादेशास **निशाणी २१** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/२ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविलेला कागद हा धनादेश परतीचा मेमो आहे. त्यावर संबधीत बॅकेच्या अधिकाऱ्यांची सही आहे. (सदर धनादेश परतीच्या मेमोला **निशाणी २२** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/३ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविलेला कागद हा मी आरोपीला दिलेल्या नोटीसची स्थळ प्रत आहे. त्यावर माझ्या वकीलांची व माझी सही आहे. सदर नोटीसमधील मजकुर बरोबर आहे. (नोटीसच्या स्थळ प्रतिस **निशाणी २३** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/४ व ३/५ कडील कागद दाखविलेले.) आता मला दाखविलेले कागद हे आरोपीला नोटीस दिल्याबाबतची पोस्टाची पावती व नोटीस मिळाल्याबाबतची पोहच आहे. (त्याना अनुक्रमे **निशाणी २४ आणि २५** देण्यात येते.)

**<u>आरोपीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

स्वाक्षरी/-

दि. २६/१२/२०२३. भानुप्रताप ब. चौहान
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग